Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# स्वामी विवेकानंद यांचे धार्मिक विचार एक अभ्यास

ऋषीकेश सुभाष मठपती

**गोषवारा**

स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्जागरणातील एक प्रभावी विचारवंत होते. त्यांनी भारतीय वेदान्त परंपरेचे आधुनिक संदर्भात पुनर्वाचन करून धर्माला केवळ कर्मकांड, श्रद्धा किंवा संन्यास यांपुरते मर्यादित न ठेवता मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाशी जोडले. त्यांच्या धार्मिक विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे प्रत्येक मानवामध्ये दडलेले दैवी स्वरूप, सर्व धर्मांमधील मूलभूत एकता, अद्वैत वेदान्त, धार्मिक सहिष्णुता, मानवसेवा आणि आत्मसाक्षात्कार. 1893 मध्ये शिकागो येथे भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेत त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे भारतीय आध्यात्मिक परंपरेला जागतिक व्यासपीठ मिळाले. त्यांनी धर्म आणि समाजसेवा यांचे ऐक्य साधत "मानवसेवा हीच ईश्वरसेवा" हा व्यवहार्य दृष्टिकोन विकसित केला. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये स्वामी विवेकानंदांच्या धार्मिक विचारांची तात्त्विक पार्श्वभूमी, प्रमुख तत्त्वे, सामाजिक आशय, आंतरधर्मीय दृष्टिकोन आणि आधुनिक काळातील उपयुक्तता यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**कीवर्ड्स**

स्वामी विवेकानंद, वेदान्त, अद्वैतवाद, धर्म, मानवसेवा, सर्वधर्मसमभाव, आत्मसाक्षात्कार, धार्मिक सहिष्णुता

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. त्यांच्या विचारांवरील वेदान्त आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रभाव समजून घेणे.
2. सर्वधर्मसमभाव आणि धार्मिक ऐक्याविषयी त्यांची भूमिका अभ्यासणे.
3. मानवसेवा आणि धर्म यांच्यातील संबंध स्पष्ट करणे.
4. त्यांच्या धार्मिक विचारांची आधुनिक समाजातील उपयुक्तता तपासणे.

**संशोधन पद्धती**

या अभ्यासासाठी मुख्यतः ऐतिहासिक, विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. स्वामी विवेकानंदांची भाषणे, त्यांच्या विचारांचे संकलन, रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहिती आणि त्यांच्या शिकागो धर्मपरिषद भाषणांचा संदर्भ घेण्यात आला आहे. प्राथमिक स्वरूपाच्या विचारांसाठी विवेकानंदांच्या प्रकाशित लेखन व भाषणांना, तर दुय्यम संदर्भासाठी संस्थात्मक साहित्याला महत्त्व देण्यात आले आहे.

**स्वामी विवेकानंदोच धार्मिक विचार**

स्वामी विवेकानंद हे भारततील समाजपरिवर्तनाच्या चळवळीतले अग्रदूत होते. त्यांनी समाजामधील साचलेला घाण बाहेर काढण्यासाठी वैज्ञानिक कसोटीचा वापर करुन समाजाच रुप बदलण्यासाठी विधाने

केले नाहीतर कृतीही केली आहे. त्यांनी वैचारिक लढाया लढले, दुस-यचे मते बदलली ती मान्य ही केली. नव्या मताचा प्रसार केला. स्वामी विवेकानंदाची भाषण, पत्र, लेख मुलाखती यांचा अभ्यास केला असता असे लक्ष्यात येते की, त्यांच्या आयुष्याच खर ध्येय होत ते भारताला उर्जितावस्था प्राप्त करुन देण हे. त्यांना भारतीय समाज सुखासमाधानान नांदवायचा होता. इथलो गरिबी, अज्ञान, जातिव्यवस्थे मुळे होणारे तंटे. दुबळयावर होणारा अन्याय कायमचे दूर व्हावेत अशी त्यांची पराकोटीचो इच्छा होती. भारतीय समाज व्यवस्थेवर जातीव्यवस्थेचा जबरदस्त पगडा होता. हा श्रधाळू अंधश्रध्देचा पगडा दूर करुन जनतेला त्यांच भल कशात आहे यांची जाणीव करुन देण हे त्यांच्या समोर महत्त्वाच ध्येय होत. स्वामी विवेकानंद यांना फक्त ३९ वर्षाच आयुष्य लाभल सुरवातीला स्वामी नी संपूर्ण भारत द्वौरा करुन भारताच वास्तव चित्र जाणून घेतल.

फक्त ३९ वर्षाच आयुष्य लाभल सुरवातीला स्वामी नी संपूर्ण भारत द्वौरा करुन भारताच वास्तव चित्र जाणून घेतल. स्वामीच्या समकालीन परिस्थितीमध्ये समुद्र पर्यटन करणे निषध मानले जाई परंतु यावर मात करुन त्यांनी परदेशात जावूण आपले विचार साता समुद्रापलिकडे पोहचविले. आजचा हिंदु धर्म हा धर्म नव्हे हा सैतानाचा बाजार आहे अस ते उद्वेगान म्हणाले असले तरी जगभरातल्या बहुसंख्याना जगण्यासाठी धर्म लागणार हे त्यांना मान्य होत. पण त्यांचा कल कायम धर्माच खर स्वरुप समजून घेण्यात आणि समजावून देण्याकडे राहिले आहे. धर्मातल्या अनैतिक, अशास्वीय बाबीच उच्चाटन करण्यासाठी विज्ञानाची कास धरण आवश्यक आहे, हे माहित होते म्हणून ते कायम विज्ञानवादाचे पुरस्कर्ते राहिले. जपानहून अमेरिकेला जाताना बोटीवर भेटलेल्या जमशेटजी टाटांना त्यांनी विज्ञानाचा अभ्यास करणारी देशी संस्था उभारण्याचा सल्ला दिला आणि त्यातून बंगळुरची आज जगप्रसिध्द असलेली आयआयटी हो संस्था उभी राहिली. विवेकानंदांना माणूस घडवणारा धर्म अभिप्रेत होता. आपण सर्व मुस्तके जाळया आणि स्वतः विचार करुया. मी जे बोलतो त्यावर तुमच्यापैकी कोणी निव्वळ विश्वास ठेवला तर मला वाईट वाटेल. स्वतः विचार करण्याची शक्ती तुमच्यात मी जागृत करु शकलो तर मला आनंद होईल मला स्त्री-पुरुषांशी बोलण्याची इच्छा आहे मेढरांशी नव्हे. असे सांगणाऱ्या विवेकानंदांचे विचार अभ्यासले तर ते काळाच्या किती पुढे होते हे लक्षात येते. समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणीहो त्यांच्या विचार साधनाचा भाग आहेत. मी समाजवादी आहे अस त्या काळात ते म्हणाले. डॉ आंबेडकरांच्या कितीतरी आधी त्यांनी वर्गलढ्यावर भाष्य केले. आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. देशात विज्ञानाच शिक्षण देणारी विद्यापीठ उभी राहावीत म्हणून प्रयत्न केले.

संन्याशान धर्माभ्यासापेक्षा खेडोपाडी जाऊन आजारी व्यक्तींची सेवा करावी अस सांगत आपल्या शिष्यांना कॉलराग्रस्तांची शुष्शा करायला लावली. लोकांना हाताशी घेऊन गटार साफ केली. सार्वजनिक आयुष्य जगतांना व्यवहारात नीतिमत्ता जपली जावी म्हणून प्रत्येक हिशेब चोख राहील याची स्वतः काळजी घेतलीच पण वेळोवेळी आपल्या शिष्यांना पत्र लिहून ते याबाबत बजावत राहिले. एका ठिकाणी डॉ.

दाभोळकर म्हणतात की, प्रत्येकाने आपापल्या मनात आजच्या काळाच्या चौकटीत या महामनवांचे कोणते बिचार कोणती कृती बरोबर हे ठरवायचे असते. कोणती कृती सांगितली असती कोणते मार्ग सुचवले असते हे ठरवायला मदत व्हावी म्हणून काळाच्या कोणत्या चौकटीत त्यांनी आपले विचार मांडले त्यांचा पिंड कोणता होता कोणत्या शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक आघातप्रत्याधातन ते घडत होते हे सारे समजावून घ्यावयास हवे.

स्वामी विवेकानंद यांनी विश्वभर भ्रमण करीत असतांना त्याना धर्माबद्दल जे अनुभव आले होते त्याचे विवेचन करताना बोस्टन येथे आपल्या भाषणात असे म्हटले की, हिंदु जात ही विवाहाला फारशी अनुकुल नाही. याचे कारण आम्ही स्वोद्वेष्टे आहोत हे नव्हे तर आमचा धर्म स्त्रियांना पूजनीय मानण्याचा आम्हाला उपदेश करतो हे आहे. प्रत्येक स्त्रीमध्ये स्वतःच्या आईला पहावे असे शिकविण्यात येते आणि कोणताही माणूस आपल्या आईसी विवाह करणार नाही. ईश्वराला समाज आई म्हणतो विवाह केला तर तो एवढ्यासाठी असतो की त्याला धर्म चरणासाठी मदतनिस हवा असतो. आम्ही आमच्या स्त्रीयांना वाईट वागवितो असे तुम्ही म्हणतो जगात असा कोणता देश आहे की जिथे स्त्रियांना वाईट तन्हेने बागबिले गेले नाही? युरोपमध्ये किवा अमेरिकेमध्ये पुरुष एखाद्या स्त्रीशी संपत्तीसाठी विवाह करीत असतो आणि तिचे धन बळकावल्यानंतर स्त्रीला ताथ मारुन घराबाहेर हाकलून लावतो. उलटपक्षी हिंदुस्थानात जेव्हा एखादी स्वी संपत्तीसाठी विवाह करते तेव्हा तिच्या मुलांना गुलाम गुलाम समजण्यात येते. परंतु जेव्हा एखादा श्रीमंत पुरुष स्वीसी लग्न करतो तेव्हा संपत्ती हो पत्नीच्या हातात असते त्यामुळे पुरुष पत्नीला घराबाहेर काढू शकत नाही. पाश्चिमात्य आणि आशियातील धर्माची तुलना करतांना स्वामी विवेकानंद यानी पाश्चात्य जगतातच त्याना असे म्हणाले की, तुम्ही आमाला मूर्तिपूजक आहोत, अशिक्षित आहोत, असंस्कृत आहोत मनता पण ह्या गोष्टी आम्हाला सांगण्यात तुमचा जो असंस्कृतपणा दिसून येतो तो पाहून आम्ही मनातल्या मनात हसत असतो. आमच्या देशात गुणानुसार व जन्मानुसार जात ठरत असते धर्मानुसार नव्हे. तुमच्या जवळ कितीही संपत्ती असलो तरी हिंदुस्थानात तुमच्यासाठी ती काही ही करु शकणार नाही. एखाद्या जातीतील सर्वात गरिब माणूस आणि श्रीमंत माणूस समान मानले जातात आणि हे एक जातीव्यवस्थेचे सर्वात सुंदर वैशिष्ट्ये आहे. या जगात पैशानेच युध्द घडले आहेत आणि पैशानेच ख्रिस्ती लोकांना एकमेकांचे गळे कापावयास लावले आहेत. पैशाच्या माघे लागलेल्या लोकांना मत्सर, द्वेष आणि लोभ हे दुर्गण उत्पन्न होत असतात. रात्रंदिवस काम, घाई, गदी आदी ह्याच गोष्टी या देशात दिसून येतात. जातीसंस्था माणसाला ह्या सर्व गोष्टीपासून वाचविते तिच्यामुळे माणसाला कमी पैशात उदर निर्वाह चालविणे शक्य होते आणि सर्वाना कामही मिळते. या जातीसंस्थेमुळे माणसाला स्वतःच्या आत्म्यावद्दल विचार करावयास वेळ मिळतो आणि भारतीय समाजात हीच गोष्ट वही आहे.

भारतात तर विलक्षण गुंतागुंतीची परिस्थिती होती. आमच्या या साम्राज्यावरील सूर्य कधीच मावळत नाही असे विनम्र दर्पोक्तीत सांगणारे ब्रिटिश साम्राज्य भारतावर राज्य करीत होते. एवढा विस्तृत व एकसंध

भूभाग मध्यवर्ती सत्तेच्या ताब्यात असण्याचा या देशाच्या ज्ञात इतिहासातील हा पहिलाच कालखंड होता. कायदा, प्रशासनाची भाषा चलन सारे एक होते. धर्माच्या नावावर होणाऱ्या सतीसारख्या अघोरी प्रथा कायद्याने नाहीशा होत होत्या. बालविवाह थांबणार होते प्रबोधनाची चळवळ सुरु झाली होती. महत्त्वाचे म्हणजे या राजवटोमुळे प्रथमच या देशाला खऱ्या अर्थाने उर्वरीत जगाची ओळख झाली होती. विज्ञान म्हणजे काय हे समजले होत. पण या जमेच्या बाजू नगण्य वाटाव्यात असे काही महाभयानक या राजवटीमुळे झाले होते. किंवा या राजवटीचे हे मोठेपण हे ऋण मान्य करीत असतानाच कार्ल मार्क्सने त्याच्या न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून मध्ये २५ जून १८५३ रोजी प्रसिध्द झालेल्या लेखात म्हटले होते. हिंदुस्थानने आजवर अनेक आक्रमणे सहजपणे पचवलीत पण ब्रिटिश राजवटीने या देशाला ज्या यातना आणि दुःख दिलेय त्याची आपण कल्पनाही करु शकत नाही. त्यांनी हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजरचनेचा कणाच मोडला.

स्वामी विवेकानंद ने ज्या सभा मंडळे माणसासारख्या माणसांकडे सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून पाहत नाहीत आपलेच देशबांधव उपासमारीने तडफडत असतांना त्याचे प्राण वाचविण्यासाठी मुठभर अन्न न देता पशुपक्ष्यादिकांचे प्रमाण वाचविण्यासाठी धान्याचे ढीग च्या ढोग वाटण्यासाठी पुढे सरसावत त्यांच्याबद्दल मला काडीचीही सहानुभूती वाटत नाही. अशांकडून या समाजाचा काही फायदा होणे अशक्य आहे. माणूस आपल्या कर्माने मरतो म्हणून कानावर जर हात ठेवलेत तर जगात प्रयत्नांना काहीच अर्थ राहणार नाही आणि मग गाई वाचविण्याच्या या तुमच्या धडपडीला तरी काय अर्थ आहे. आपल्या कर्मानीच कसायच्या हाती पडतात आणि मरतात असे म्हणा प्रचारक हे ऐकून हादरलाच पण स्वतःला सावरुन तो म्हणाला आपण म्हणता ते तस खर पण शास्वात सांगितल आहे गाय आपली आई आहे. यावर किंचित हसून स्वामीजी म्हणाले हो गाय आपली आई हे तर उघडच दिसते. नाहीतर असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटी बरे निपजणार हा संवाद झालाय १८९७ मध्ये श्री प्रियनाथ मुखोपाध्याय यांच्या घरी बागबाझार कलकत्ता येथे आहे. तो शरचंद्र चक्रवृती यांनी शब्दांकित केला आहे आणि हा संवाद रामकृष्ण मठाने स्वामी विवेकानंद ग्रंथावलीचे जे दहा खंड प्रसिध्द केलेत त्यातील तिसऱ्या खंडात सुरुवातीला दिला आहे. या संधिप्रकाशात विवेकानंद असे एकाकी एकटे पण बादळासारखे हिंडत होते केवळ भारतात नव्हे तर जगभर.

जगातील सारी माणसे सारखीच आहेत सर्वांचे प्रश्न एकमेकात गुंतलेले आहेत. त्यांना धर्मगुरु म्हणून ओळखत होते. पण धर्म हा मानवी जीवनाला आधार म्हणून आवश्यक आहे हे सांगत असतानाच आजचे सारे प्रश्न या धर्मानी निर्माण केलेले आहेत. असे सांगूण हे धर्मप्रेमी मंडळींच्या सभेत सर्व धर्मावर नास्तिकालाही आश्चर्य वाटावे असे घणाघाती प्रहार करीत होते. वैश्विक प्रश्नांची त्यांना जाण होती आणि ते त्यांची आश्चर्यकारक रीतीने नवी मांडणी करुन संपूर्ण वेगळी नवी उत्तरे सांगत होते. चातुर्वण्यांची यांच्या मनातील रचना फार वेगळी नवी उत्तरे सांगत होते. चातुर्वण्यांची यांच्या मनातील रचना फार वेगळी होती. हे साम्यवाद्याला शुद्रांची राजवट म्हणत होते. आजवर जगात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांच्या राजवटी झाल्यात

त्यापेक्षा हो शुद्रांची राजवट अधिक चांगली असेल म्हणून सांगत होते. १८९७ स्वामीने बेलूर मठात आपल्या अनुयायांना त्यांनी सांगितले मला जगात पुढे घडून येणाऱ्या साऱ्या घटना दिसताहेत. वर्षानुवर्ष केलेल्या निरीक्षणातून मला सारे जाणवते आहे. अभ्यास आणि प्रवास यांची मी केलेली साधना हे त्याचे कारण आहे. खगोलशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे दुर्बिणीतून ताऱ्यांच्या हालचालो पहातात तसे भविष्यातील जगात काय होईल हे मला दिसते आहे. मी तुम्हाला निश्चयाने सांगतो. हा शूद्र जातीचा उठाव प्रथम रशियामये होईल नंतर चीनमध्ये होईल. या संधिप्रकाशात येणारा साम्यवाद त्यांना स्पष्टपणे दिसत होता. ते त्याचे समर्थक होते आणि त्याच्यात असलेल्या त्रुटीमुळे अस्वस्थ होते. १ नोव्हेंबर १८९६ रोजी आपल्या एका अनुयायाला पाठविलेल्या पत्रात स्वामीने म्हटले की, ही राजवट येईलच तिला कोणी थोपवू शकणार नाही. या राजवटीमुळे आजच्या विषम ङ गड्यात गरिबाला चांगली संधी मिळेल. मात्र समाजबाद साम्यवाद या परिपूर्ण वा निदर्दोष अशा शासनपध्दती आहेत आणि म्हणून मी समाजवादी आहे असे मुळीच नाही. तर दगडापेक्षा बोट मऊ या दृष्टिनेच मो समाजवादी आहे. पण या राजवटीत जे दोष आहेत त्यामुळे ही राजवट पण दीर्घकाळ टिकणार नाही स्वामीजी हे सांगत होते की, १८९७ मध्ये रशियन राजवटीची सुरुवात होण्याच्या जवळजवळ पंचवीस वर्ष आदो आणि त्या राजवटीचा अंत होण्याच्या जवळजवळ शंभर वर्ष आदी आणि कोणाला पटो न पटो हो साम्यवादी राजवट का कोसळेल याचे त्यांनी आपल्या मनाशी एक उत्तर शोधले होते. फेब्रुवारी १८९७ मध्ये मद्रासमधील हिंदुला मुलाखत देतांना त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. सगळ्या साम्यवादी सिध्दांताना आध्यात्मिक अधिष्ठान आवश्यक आहे आणि ते आध्यात्मिक अधिष्ठान फक्त वेदांतच आहे.

विज्ञान आणि वैज्ञानिक मांडणी मानणाऱ्या स्वामी विवेकानंदांनी चार धार्मिक गोष्टी सांगितल्या. धर्माचे सनातन महत्त्व सांगितले. अशाश्वत मानवी जीवनाला धर्म हा शश्वत आधार देतो म्हणून धर्म आणि विज्ञान यांचे सहकार्य नव्हे तर समन्वय हवा म्हणून सांगितले. त्याचबरोबर आजचे बहुतेक सारे प्रश्न धर्माची अधार्मिक मांडणी झाल्याने निर्माण झ शालेत म्हणून सांगितले. या देशाला नव्हे तर साऱ्या जगाला सर्वधर्मसमभाव अत्यावश्यक आहे हे वैज्ञानिक भाषेत सांगितले. मात्र स्वामी विवेकानंद सर्वाधिक अस्वस्थ होते ते या देशाच्या अवनतीबद्दल या देशाला सर्वधर्मसमभाव तर हवाच मात्र त्यापेक्षा अधिक गरज आहे तो या देशातील बहुजनांचा धर्म खऱ्या अर्थाने बहुजनांचा बनविण्याची बहुजनांच्या धर्मातील उच्चवर्णीय अनेक प्रकारे अनेक शतके बहुजनांची पिळवणूक करीत आले आहेत त्यावावत त्यांनी प्रायश्चित घेतले पाहिजे. १७ ऑगष्ट १८८९ प्रमदादास यांना पाठविलेल्या पत्रात स्वामी विवेकानंद आणखी पुढे गेले. त्यांनी सांगितले स्पार्टा देशातील लोकांनी तेथील गुलामांवर वा अमेरिकन लोकांनी तेथील निग्रोंवर जेवढे अत्याचार केलेत त्यापेक्षा जास्त अत्याचार आपल्या देशातील शुद्रांवर केले गेले आहेत याबाबत संदेह नसावा. जर एखाद्याला कर्माच्या व गुणांच्या पलीकडे जावयाचे असेल तर त्याने जातिभेदाची कल्पना मनालादेखील शिवू देऊ नये. असली कल्पना बाळगल्यास त्याची स समाजाची फार मोठी हानी होईल.

मात्र हो प्रबोधनाची लढाई लढत असतांना धर्माचा आधार घेऊन धर्मातील अपप्रवृत्तींवर आघात केलात तरच तो समाजात पोहोचेल व रुजेल हे त्यांचे सूत्र होते. विशुध्द स्वरुपातील धर्म हा मानवाचा व मानवी समाजाचा प्रमुख आधार आहे हे त्यांचे मत होते. राजा राममोहन रॉय यांच्यापासून सर्व समाजसुधरकांचे प्रयत्न फसले कारण त्यांनी धर्मातील अपप्रवृत्तीवर नव्हे तर धर्मावर आघात केला हे त्यांनी अनेकदा सांगितले आणि हे असे वाटप असल्यामुळेच परिवर्तनाची लढाई लढत असतानाच प्रमदादासाबरोबर त्यांनी पत्रव्यवहार केला. शास्त्री पंडिताबद्दल आदर ठेवून त्यांच्याशी शास्त्राच्या आधारे वादविवाद करण्यास आपला वेळ घालविला.

## निष्कर्ष

स्वामी विवेकानंदांचे धार्मिक विचार हे भारतीय वेदान्त परंपरेचे आधुनिक, व्यावहारिक आणि मानवकेंद्री रूप मानता येते. त्यांच्या धार्मिक तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आत्म्याचे दैवी स्वरूप, अद्वैत वेदान्त, आत्मसाक्षात्कार, सर्वधर्मसमभाव आणि मानवसेवा हे घटक आहेत. त्यांनी धर्माला कर्मकांडांच्या मर्यादेत न ठेवता जीवनाच्या प्रत्यक्ष व्यवहाराशी जोडले. गरीब आणि पीडित व्यक्तीमध्ये ईश्वराचे दर्शन घेण्याची भूमिका मांडून त्यांनी धार्मिकतेला सामाजिक जबाबदारीचे स्वरूप दिले. तसेच विविध धर्म हे मानवी आध्यात्मिक शोधाचे वेगवेगळे मार्ग असू शकतात, हा व्यापक दृष्टिकोन त्यांनी जागतिक स्तरावर मांडला. शिकागो धर्मपरिषदेत त्यांच्या विचारांना मिळालेला प्रतिसाद हा त्यांच्या जागतिक प्रभावाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. एकूणच, विवेकानंदांचा धर्म हा **आत्मविकास आणि समाजसेवा, अध्यात्म आणि व्यवहार, वैयक्तिक मुक्ती आणि विश्वकल्याण** यांचा समन्वय साधणारा धर्म आहे. म्हणूनच त्यांच्या धार्मिक विचारांचे महत्त्व आजही केवळ भारतीय संदर्भात नव्हे, तर जागतिक मानवतावादी आणि आंतरधर्मीय संवादाच्या संदर्भात कायम आहे.

संदर्भ सूची :-

१. स्वामी गंभिरानंद युग नायक विवेकानंद, प्रकाशन रामकृष्ण मठ नागपुर
२. स्वामी विवेकानंद ग्रंथावली, खंड सातवा व आठवा, रामकृष्ण मठ नागपूर
३. सुनील आंबेकर, भारत पुरुत्थान के शिल्पकार स्वामी विवेकानंद, प्रकाशन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद माहिम मुंबई
४. इंद्रा स्वप्न, दिनमान प्रकाशन, २०१४ चरखांवालान दिल्ली-११०००६
५. प्रकाशक अध्यक्ष, रामकृष्ण मठ धंतोली नागपूर संपादक, स्वामी शिवतत्वानंद स्वामी व्योमरुपानंद
६. दत्तप्रसाद दाभोळकर, शोध स्वामी विवेकानंदाचा, मनोविकास प्रकाशन
७. वसंत पोतदार, योध्दा संन्याशी, राजहंस प्रकाशन पूणे